*मुळा एज्युकेशन सोसायटीचे,*

# कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय

# सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर,

सावित्रीबाई फुले पुणे विदयापिठाच्या एम.कॉम. पदवी करिता सादर करावयाचा

प्रकल्प अहवाल

शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१

प्रकल्पाचे नाव

**सोनई परिसरातील पशुपालन व्यवसायाचा आणि दुध उत्पादकांचा अभ्यास करणे.**

संशोधक वदि् यार् थी

आकाश रजनीकांत बेल् हेकर

एम. कॉम II रोल नां.५४१

मार्गदर्शक

**प्रा. डॉ. श्री. दरंदले एस.आर.**

एम.कॉम. एम.फिल पी. एच. डी.

वाणिज्य विभाग

मुळा एज्युकेशन सोसायटीचे

कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय सोनई, ता. नेवासा जि. अहमदनगर

**प्राचार्य डॉ. शंकर लावरे**

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, एम कॉम भाग २ याने २०२०-२१ सेमिस्टर चार मधील पेपर क्रमांक ४ प्रोजेक्ट वर्क या विषया अंतर्गत सोनई परिसरातील पशुपालन व्यवसायाचा आणि दुध उत्पादकांचा अभ्यास करणे. हा प्रकल्प अहवाल सादर केला आहे.

दिनांक12/7// २०२१

स्थळ सोनई

| सही | सही | सही |
|---|---|---|
| मार्गदर्शक | विभाग प्रमुख | समन्वयक |

# मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र

प्  रमाणणत करण्  यात येते फक, आकाश रजनीकांत बेल्  हेकर याने साणवणत्  रवाई फुले पुणे विदयापिठाच्या संलग्नित विदयापिठाच्या पदव्युतर विभाग कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय, सोनई येथील एम कॉम भाग २ चा विदयार्थी आहे. याने **सोनई परिसरातील पशुपालन व्यवसायाचा आणि दुध उत्पादकांचा अभ्यास करणे**. या विषयावर प्रकल्प अहवाल तयार केला आहे. प्रस्तुत प्रकल्प अहवाल माझ्या मार्गदर्शनाखाली पुर्ण करण्यात आला आहे. प्रस्तुत प्रकल्प अहवाल त्यांच्या स्वतःच्या कार्याची निष्पती असुन त्याचे संशोधन प्रकल्प अहवाल पुणे विदयापिठाच्या एम.कॉम. च्या अध्यादेशातील तरतुदींना अनुसरून आहे. असे मी प्रमाणित करतो.

दिनांक  /  / २०२१

स्थळ: सोनई

मार्गदर्शक

**प्रा. डॉ.श्री.दरंदले एस.आर.**

एम.कॉम, एम.फिल पी.एच.डी

वाणिज्य विभाग

# प्रतिज्ञापत्र

या संशोधन अहवालात समाविष्ठ करण्यात आलेले कार्य हे मी स्वतः केलेले आहे. त्यासाठी मला वेळोवेळी मार्गदर्शकाकडून मार्गदर्शन मिळाले. मी संशोधनाचे कार्य संदर्भ खेरीज कोणाकडून कोणतीही मदत घेतलेली नाही. असे मी प्रतिज्ञापूर्वक घोषित करतो. या संशोधनासाठी उपयोगात आणलेली संदर्भ पुस्तके विविध प्रश्नावक्ता या सर्वांचा संदर्भ सूचीमध्ये निर्देश करण्यात आलेला आहे.

ठिकाण: सोनई

दिनांक:.   /   /२०२१

विदयार्थ्याचे नाव

आकाश रजनीकांत बेल्   हेकर

( एम कॉम II )

# ऋणनिर्देश

पुणे विदयापिठाच्या पदविका अभ्यास अंतर्गत ज्या वेगवेगळया विषयांचा समावेश होतो. विदयार्थ्यांना संशोधन पध्दतीची माहिती व्हावी म्हणुन निरनिराळया विषयांवर पाहणी करूण प्रकल्प अहवाल सादर करण्याचे काम विदयार्थ्याकडुन पदविका परीक्षा भाग २ मध्ये घेतले. हि संशोधन करण्याची किंवा अहवाल सादर करण्याची संधी मला पुणे विदयापिठाने उपलब्ध करून दिलेली आहे. आहे.

या संशोधनासाठी मला जी काही आवश्यक असणारी पुस्तके, मासिकेग्रंथालयामधील सेवकांनी उपलब्ध करून दिली त्यांचा मी ऋणी आहे मला संशोधनासाठी मार्गदर्शक म्हणून लाभलेले **प्रा. डॉ. श्री.दरंदले एस.आर**. यांचा मी ऋणी आहे. तसेच **प्रा. आदमने** आणि **प्रा.ढोकणे मॅडम** यांनी केलेल्या वेगवेगळया मार्गदर्शनामुळे मी हा माझा प्रकल्प पूर्ण करू शकलो. त्यांचाही मी ऋणी आहे.


आकाश रजनीकांत बेल् हेकर

**कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय,**

**सोनई, ता. नेवासा जि. अहमदनगर**

# अनुक्रमणिका


| अनु. क्र. | | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | | **संशोधनाची पार्श्वभूमी** | |
| | १.१ | प्रस्तावना | ८ |
| | १.२ | सोनई गावची दूध व्यवसायाची पार्श्वभूमी | ९ |
| | १.३ | सोनई गावातील दूध उत्पादन | १० |
| | १.४ | सोनई गावाचे आर्थिक व सामाजिक समालोचन | ११ |
| २ | | **संशोधन पध्दती** | |
| | २.१ | संशोधनाचा विषय | १२ |
| | २.२ | संशोधनाची उदिष्टे | १३ |
| | २.३ | संशोधनाची व्याप्ती | १४ |
| | २.४ | संशोधनाची गृहितके | १५ |
| | २.५ | संशोधनाची पध्दती | १६ |
| ३ | | **पशूधन व्यवसायाचे व्यवस्थापन** | |
| | ३.१ | दूध व्यवसायाचे व्यवस्थापन | १७ |
| | ३.२ | गोठा व्यवस्थापन | १९ |
| | ३.३ | अहार व्यवस्थापन | २० |
| ४ | | **दुग्ध व्यावसायिकांचा आढावा** | |
| | ४.१ | सोनई गावातील एकुण दूध संकलन केंद्र | २१ |
| | ४.२ | सोनई गावातील दूध उत्पादक शेतक-यांच्या मुलाखती | २३ |
| | ४.३ | दुध व्यवसायाचे अर्थशास्त्र | ३३ |

| | | | |
|---|---|---|---|
| **५** | | **संदर्भ आणि प्रश्नावली** | |
| | ५.१ | समस्या | ३४ |
| | ५.२ | निष्कर्ष | ३५ |
| | ५.३ | संदर्भसूची | ३६ |
| | ५.४ | प्रश्नावली | ३७ |

## प्रकरण पहिले

## संशोधन विषयाची पार्श्वभूमी

### १.१. प्रास्ताविक:-

आपला भारत देश हा कृषीप्रधान देश आहे. शेतीवर आधारीत पशुपालन या जोडधंदयावर बहुतांश शेतक-यांनी लक्ष केंद्रीय झालेले आहे, शेतीपुरक व्यवसायामध्ये दुग्ध व्यवसाय हा पूर्वीपासुन परंपरागत चालत आलेला महत्वाचा व्यवसाय आहे. दुग्ध व्यावसायासाठी प्रामुख्याने सकरीत गाई- म्हशी पाळल्या जातात. प्रचलित पध्दतीने दुध व्यवसाय कण्यापेक्षा आधुनिक तंत्राने व्यापारी दृष्टया हा व्यवसाय केला असता निश्चितपणे शाश्वत धंदा असुन आर्थिकदृष्या चांगला परवडतो.

आहार दृष्टया प्रत्येकाला प्रतिदिनी 30 मि.ली दुधाची गरज असते. आपल्याकडे गाईपासुन ४५ % तर म्हशीपासुन ५२ %दुध मिळते पण यात सध्या तरी उलटे चित्र दिसू लागले आहे. दुधापासुन अनेक पदार्थ तयार करता येतात फायदेशीर दुधाळ गाई व म्हशीची निवड केली जाते. दुध व्यवसायामध्ये जर्सी, देवणी, गीर सिंधी, थारपारकर या गाईची निवड केली जाते. तर दिल्ली, गु-हा, पंढरपुरी, जाफराबादी या म्हशी पाळल्या जातात. पशुना अब.क आणि ई जीवनसत्यासाठी हिरव्या चा-याची पुरवठा केला जातो. म्हणजे त्यापासून दुधात घनपदार्थ म्हणजेच फॅट जास्त मिळते.

गाई-म्हशींना डेंग्यू रेबीज, गोचीडताप, जंत, लाल्या खुरकत यासारख्या आजाराची लागण होते अशा आजारावर प्रतिबंध घालण्यासाठी त्यांना लसीकरण करणे अत्यंत गरजेचे असते.

## १.२. सोनई गावातील दुग्ध व्यवसायाची पार्श्वभूमी

काही वर्षापूर्वी सोनई गावमध्ये खुप थोडया प्रमाणावर पशुपालन हा व्यवसाय केला जायचा त्यावेळी लोकांचे लक्ष शेतीवर या क्षेत्रावर जास्त असायचे मात्र दिवसें दिवसें शेतीचे क्षेत्र कमी होताना आपल्याला दिसत यामुळे फक्त शेतीवरच्या उत्पन्नावर शेतकरी अवलंबून न राहता आपल्या शेतील जोड धंदा शोधण्याचा प्रयत्न करतात. पुर्वी दुग्ध व्यवसायकडे फारसे लक्षही शेतकरी देत नसत तसेच त्याचा व्याप व स्वरूप मोठया प्रमाणवर वाढलेले नव्हते, मात्र दुधाची वाढती मागाणी व औदयोगीक स्वरूपाचे होणारे बदल यामुळे शेतकरी हा या दुग्ध व्यवसायाकडे आता शेतीला पर्यायी व्यवसाय म्हणून पाहत आहेत.

सन २००१ सालापासून ख-या अर्थाने गावामध्ये पुरेशाप्रमाणात दुग्ध व्यवसायाला सुरवात झाली. गावातील बेरोजगार तरुण आपल्या शेती बरोबरोच दुग्ध व्यावसायाच्या माध्यमातून रोजगार निर्मितीचा शोध घेवू लागला यामुळे गावातील तरुणांनी या व्यवसायाकडे उदननिर्वाहाचे साधन म्हणुन पाहणे सुरू केले आज सोनई गावची परिस्थिती पाहता आज गावात जवळ जवळ 5 पेक्षा अधिक दुध संकलन केंद्र आहेत. तसेच काही शेतकरी हे सोनई परिसरात दुध घरोघरी पोहच करतात.

## १.३.सोनई गावाचे आर्थिक व सामाजिक समालोचन:

सोनई गाव हा पूर्ण दुध व शेती व्यवसाय करणारा भाग आहे सोनई गावचे क्षेत्रफळ सुमारे ६०७.०० हेक्टर असून गावची लोकसंख्या अंदाजे ३१००० घ्या पुढे आहे. सोनई गावामध्ये पशुच्या आरोग्यासाठी सरकारच्या अनेक सुविधा उपलब्ध आहेत गावामध्ये पशुपालन व्यवसायाचा हळुहळु विस्तार होत गेला.

सोनई मधील शेती पूर्ण बागायती असून गावातील मुख्य व्यवसाय हा शेती आहे. येथील सर्व कुटुंबे ही शेती क्षेत्रावरच अवलंबून आहेत. या शेती क्षेत्राला जोड व्यवसाय म्हणुन गावामध्ये मोठ्या प्रमाणावर पशुपालनाचा व्यवसाय केला जातो. यामुळे गावाच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते. गावाजवळुन मुळा कॅनॉलचे पाणी वाहत असल्याने गाव बागायत क्षेत्रामध्ये गणले जाते कॅनॉलमुळे गावाच्या आर्थिक विकासात मोठया प्रमाणात भर पडली आहे. शेती क्षेत्र तसचे पशुपालन व्यवसायाशी निगडीत असलेल्या शासनाच्या विविध योजनांची अमंलबजावणी केली जाते.

## १.४ सोनई गावातील दुधउत्पादन :

सोनई गावातील अल्पभुधारक शेतकरीसुध्दा जास्तीत जास्त दुधाचे उत्पादन चांगल्या प्रकारे करतो. कारण जवळच परिसरामध्ये दुध प्लॅट असल्यामुळे दुध व्यवसायातील चढ- उतार हे उत्पादकाच्या लक्षात येतात. व्यवसायामध्ये अनेक पध्दतींनी पशुपालनाच्या सोयी सुविधा राबवता येतात. त्यामुळे शेतक-यांना दुध व्यवसाय करण्यास प्रोत्साहन मिळते. आपण केलेल्या दुध संकलनाची प्रत चांगल्या प्रकारची राहिल त्याकडे उत्पादकाचे जास्तीत जास्त लक्ष असते सोनई गावचा दुध उत्पादनामध्ये अग्रक्रम आहे.

# प्रकरण दुसरे

## संशोधनाची पध्दती

### २.१ संशोधनाचा विषय :

सोनई परिसरातील पशुपालन व्यवसायाचा आणि दुध उत्पादकांचा अभ्यास करणे

## २.२ संशोधनाची उद्दिष्टये

• सोनई गावातील पशुपालन व्यवसायातील दुधविकी बाबत अभ्यास करणे.

• पशुपालन व्यावसायातील जनावरांच्या संगोपनाविषयाची माहितीचा आढावा घणे.

• व्यवसयाच्या उत्पन्नातुन शेतक-याच्या कुटुंबाच्या प्रगतीविषयी चर्चा करणे.

• शेतक-यांच्या दृष्टीने पशुपालन व्यवसायाचे प्रत्यक्ष भेटी आणि मुलाखती घेणे.

दुधउत्पादकाने व्यवसायातील जनावरांचे केलेले व्यवस्थापनाविषयी माहिती घेणे

• सोनई गावातील दुधउत्पादक शेतक-यावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करने.

## २.३ संशोधनाची व्याप्ती :

पशुपालन व्यवसायामधुन दुधविक्री करणाचा शेतक-यांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. सोनई गावातील दुध संकलन हे पंचक्रोशीमध्ये प्रथम क्रमांकावर आहे. सोनई गावामधुन मोठया प्रमाणावर दुध उदयोगसमुहाकडे पुरविले जाते सदयस्थितीमध्ये बाजारपेठेत दुधाचा पुरवठा अपुरा पडत आहे. त्यामध्ये वाढ करण्याचा महत्वाचा वाटा सोनई गावचा आहे. अल्पभुधारक शेतक-यांनी शेतीपेक्षा दुधव्यवसायाकडे लक्ष केंद्रित केले आहे. या व्यवसायातुन असंख्य शेतक-यांनी मोठया प्रमाणावर यश संपादन केले आहे. या संशोधनामध्ये दुधउत्पादक शेतक-यांवर व्यवसायाचा चांगला वाईट परिणमाचा अभ्यास केलेला आहे. या संशोधनामध्ये व्यावसायीकाने व्यवसायाचा केलेल्या व्यवस्थापनाची आढावा घेण्याम आला आहे.

**२.४ संशोधनाची गृहितके :**

- सोनई गावातील दुधाच्या दरवाढीमध्ये घेतलेल्या सभेमध्ये आर्थिक, सामाजिक उपस्थिती.
- व्यवसयामध्ये जनावरांच्या आरोग्यासाठी शासनाने दिलेल्या सुविधा.
- व्यवसायामधुन झालेल्या उत्पन्नाचे व्यावसायिकाने तयार केलेले नफा तोटा पत्रक

२.४ संशोधनाची गृहितके :

- सोनई गावातील दुधाच्या दरवाढीमध्ये घेतलेल्या सभेमध्ये आर्थिक, सामाजिक उपस्थिती.
- व्यवसयामध्ये जनावरांच्या आरोग्यासाठी शासनाने दिलेल्या सुविधा.
- व्यवसायामधुन झालेल्या उत्पन्नाचे व्यावसायिकाने तयार केलेले नफा तोटा पत्रक

- दुधविकीच्या स्थिर दरामुळे व्यवसायाचे प्रमाण वाढत आहे.

## २.५ संशोधनाच्या पध्दती

**पध्दती**

प्राथमिक तथ्य संकलन

व्दितीय तथ्य संकलन

प्रस्तुत प्रकल्प अहवाल पूर्ण करण्यासाठी संशोधकाने प्राथमिक व व्दितीय दुध संकलन पध्दतीचा वापर केला आहे. यामध्ये संशोधकाने ,सोनई परिसरातील विविध दुध विक्रेते दुध संकलन केंद्राच्या मुलाखती घेतल्या आहेत. या प्रकल्प अहवालासाठी संशोधकाने व्यावसायिक पुस्तके, मासीके, अॅग्रोवन प्रत्यक्ष शेतक-यांच्या मुलाखती यांचा आधार घेतला आहे.

## प्रकरण तिसरे

## पशुधन व्यवसायाचे व्यवस्थापन

### ३.१ दुध व्यवसाय व्यवस्थपान :-

जगातील सर्वाधिक पशुपालन असलेल्या देशामध्ये जरी भारताचा समावेश होत असला तरी सुध्दा जागतिक दुध व्यवसायातील भारताचा हिस्सा केवळ % ०१. आणि त्यापैकी महाराष्ट्राचा हिस्सा ८ % इतका असुन आपल्या सोनई गावातील शेतक-यांपैकी ७५% शेतकरी पशुपालन व्यवसाय करतात. आजच्या परिस्थितीचा विचार करता दुग्ध उत्पादन व्यवसायास उज्वल भविष्य आहे. त्यामुळे प्रत्येक शेतक-याने चार पाच संकरित गाईपासुन दुधाचे व्यवस्थापन सोनई गावामध्ये केले आहे. दुग्ध व्यवसाय नफयात चालण्यासाठी दुधाळ गाईची निवड, पशुपोषण सभोवतालची परिस्थिती या सर्व गोष्टीवर लक्ष देण्यात आले आहे. त्यामुळे पुढील काळात उत्तम व्यवस्थापनाने खर्च कमी करून दुध व्यवसाय करणे आवश्यक आहे. किफायतशीर दुध उत्पादनाकरीता खालील बाबींकडे आवर्जुन लक्ष देणे गरजेचे आहे.

**दुधाळ गाईची निवड :**

१. कमी दुध देणा-या भाकड गाईऐवजी अधिक दुध उत्पादन देणा-या संकरीत गाईची निवड केली पाहिजे.

२. जास्त विदेशी रक्त प्रमाण असणा-या गाईना व्यवस्थापन अतिशय चांगले असते अन्यथा विविध रोगांना जनावरे बळी पडतात.

३ दुस-या किंवा तिस-या वेतातील गाय निवडुनच दुध प्रत्यक्ष  गाईची खरेदी केली जाते.

४. बाजारात गाई खरेदी करताना दलाला मार्फत फसला जाणार नाही. याची दक्षता घेणे अत्यंत जर गरजेचे आहे. कारण बाजारामध्ये येणा-या प्रत्येक जनावरांची कोणी खात्री देवू शकत नाही.

५. दुध उत्पादनासाठी दुधाळ गाईची म्हणजे मोठा

गाईची निवड करणे अत्यंत गरजेचे आहे.

६. कास हाताला लागणारी, लांब, रूद आणि वर पर्यंत गेलेली असावी त्यामध्ये चारही सड सारख्या आकाराचे व समांतर असणे आवश्यक आहे.

**३.२ गोठा व्यवस्थापन :**

सोनई गाव आणि परिसरामध्ये जनावरांना गोठयाचे व्यवस्थाप हे दर्जेदार प्रकारचे केलेले आहे. दुभत्या गाईना आरोग्यदायक थंडी, ऊन, वारा पाऊस यापासून संरक्षण करणारा गोठा असे व्यवस्थापन आहे. संकरित जनावरांना अधिक आजारांची उत्पती होते

असल्याचे लक्षात आले साधारणतः पाच ते सहा गाईसाठी २० फुट लांब व ८फुट रुंद अशी जागा लागते गोठा बांधताना तो पूर्व पश्चिम आहे बहुतांश गोठे हे पूर्व पश्चिम असण्याचे कारण उन, वारा, पाउस याच्या संरक्षणासाठी करण्यात आले आहे त्याचप्रमाणे काही गोठयांना मागच्या आणि पुढच्या बाजुने भिंतीचे नियोजन केले गेले आहे. भिंतीना प्लास्टर करणे गरजेचे आहे कारण त्यामध्ये गोचीडाना राहण्यासाठी किंवा अंडी घालण्यासाठी जागा मिळत नाही आणि गोठ्यामध्ये काहीशा प्रमाणात गव्हाण बांधल्या गेलेल्या आहेत काही ठिकाणी त्या गव्हाणी गोठयाच्या एका बाजुला असल्याचे दिसुन येते.

गावामध्ये काही प्रमाणात मुक्त गोठा व्यवस्थापन करण्यात आले आहे. साधारणतः दहा ते बारा गाईसाठी हा गोठा बांधण्यास त्यामध्ये ५० फुटी शेडच्या चारही बाजूंनी १०० फुटापर्यंत वाल कम्पाउंड करून त्यामध्ये गव्हाण आणि पाण्याच्या हौदा सह जनावरांसाठी व्यवस्थापन केलेले आहे. त्याचप्रमाणे कुठल्याही गाईला दोर दावे बांधलेले नसतात. त्यामधील मोकळया वातावरणामुळे जनावराचे आरोग्य आणि दुध तसेच कटाक्षपणा यात सुधारणा घडुन आल्याचे दिसुन येते.

**३.३ आहार व्यवस्थापन :**

दुग्ध व्यवसायामध्ये जास्तीत जास्त खर्च हा पशुंच्या आहारावर होत असतो. त्यामुळे आपल्या दुभत्या गाई- म्हशीची निगा ठेवणे तिच्या आहाराकडे लक्ष पुरवणे, आहाराचा पूर्णपणे उपयोग करून त्यातुन

जास्त उत्पादन कसे मिळेल याकडे विशेष लक्ष दुधउत्पादक शेतक-या असते. खाल्लेल्या अन्नाचे दुधात रूपांतर करण्याची क्षमता ही संकरीत गाईत जास्त असते. त्यामुळे योग्य व संतुलित आहार वापरून पूर्णपणे उपयोग करून घेणे हे दुध व्यवसायाचे मुलभुत तत्व आहे. सकस व संतुलित आहार गाईना दिल्यास दुध उत्पादनात सातत्य राहते व त्याच बरोबर शरीराला झीज होत नाही चांगली वाढ होते रोगाला सहज बळी पडत नाही तसेच प्रजननाच्या कियेस सहसा अडथळा येत नाही

सर्वसाधारणपणे गाईंना सुकाचारा देण्य यावा त्यामध्ये वाळलेले गवत ज्वारी, बाजरी, मक्याचा कडबा यांचा समावेश होतो. त्याचप्रमाणे जनावरांना हिरव्या चा-याचा देखिल समावेश आहे गाईंच्या गाभण काळात शेवटचे दोन महिने दुध उत्पादन बंद असल्यामुळे खुराक कमी केला जातो असे न करता दोन किलो खुराक वाढीव दिला जातो त्यामुळे गर्भाची वाढ चांगल्या प्रमाणात होते व पुढील वेताचे दुध उत्पादन चांगले मिळते. त्याचप्रमाणे पाणी देखील जनावरांना मुबलक प्रमाणात देण्यात येणे अत्यंत गरजेचे आहे. जास्त पाण्याने गाईचे पचन किया सुरळित चालु राहते

# प्रकरण चौथे

## दुग्ध व्यावसायिकांचा आढावा

### ४.१ सोनई गावातील एकूण दुध संकलन केंद्र :

सन २००५ नंतर शेती व्यवसायाबरोबरच जोडधंदा म्हणुन पशुपालन व्यवसाय सोनई परिसरात वाढत गेला यामुळे गावातील प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले. यामुळे गावात पाच लपेक्षा दुध संकलन केंद्राव्दारे दूध संकलीत केले जाते.

दूध संकलन केंद्र

| अनु. क्र. | दूध संकलन केंद्राची नावे | संकलीत दुध प्रतिदीन |
|---|---|---|
| १ | श्   री गणेश दुध सांकलन केंद्   र | १२०० लिटर |
| २ | प्   रभात दूध डेअरी | १००० लिटर |
| ३ | माऊली दुध संकलन केंद्र | १२२५ लिटर |
| ४ | पतांजली दूध सांकलन केंद्   र | १३०० लिटर |
| ५ | शनैर्   श्   र दूध डेअरी | १५०० लिटर |
| | एकूण | ६,२२५ लिटर |

# एकूण दूध संकलन

**विश्लेषण :**

सोनई गावात दूध संकलनाच्या माध्यमातून प्रतीदिन ६,२२५ लिटर एव्हढे दूध संकलन केले जाते. ही आकडे वारी दिवसेंदिवस वाढताना दिसते.

## ४.२ सोनई गावातील दुधउत्पादक शेतक-यांच्या प्रत्यक्ष भेटी आणि मुलाखत

१) नाव: कैलास दरंदले

सोनई येथील विकास बाळासाहेब येवले हे गृहस्थ बी.एस.सी पदवी प्राप्त करून नोकरीच्या मागे न लागता दुग्ध व्यवसाय सुरू केला व्यवसायातील अनेक संकटाना सामोरे जात आज तो व्यवसायात चांगलाच स्थिर झाले आहे दुध व्यवसायातुनच आपल्या दोन भावंडाचे शिक्षण त्यांनी पूर्ण केले. तसेच त्यांनी नियोजन, काटकसर, श्रम, सातत्य यांची सांगड घालुन त्यांनी घराच्या आवारात १० गाईंचा आदर्श गोठा तयार केला आहे.

- दुध व्यवसायाची सुरूवात

घरची परिस्थिती जेमतेम असल्यामुळे दुध व्यवसायासाठी लागणारे पुरेसे भांडवल नव्हते वडिलोपार्जित जर्सी गाईंचा संगोपन करून तिच्यापासुन झालेल्या कालवडींचा सांभाळ केला परिस्थिती सुधारताच त्यांनी काही गायांची लागोपाठ खरेदी देखील केली आणि त्यातुन गाईंची संख्या वाढवण्याचे प्रयत्नशील आहे.

गरजे एवढे मनसोक्त पिण्याचे पाणी त्यांना उपलब्ध केले जाते गोठयात रात्रभर पुरेसा प्रकाश रहावा यासाठी LED बल्प व्यवस्था आहे. दुध काढण्यासाठी मिल्किंग मशीनचा वापर केला जातो दुध काढताना वीज गेली तर जनरेटरचा देखील वापर केला जातो.

- जनावराचे संगोपण :

कैलास यांच्    या गोठयात १० सांकररत गाईचे सांगोपन केले. जाते. पैकी ८ गाई सध्या दुभत्या तर २ गाभण आहेत नियमित ओला चारा उपलब्ध व्हावा यासाठी आपल्या २ एकर क्षेत्रामध्ये उस मका, घास अशी पिके घेतली जातात. जनावरांसाठी कडबा कुट्टीचा वापर केला जातो नियमित संतुलित आहार दिल्यामुळे दुध उत्पादनात सातत्य टिकुन राहते याच पदधतीने सहा ते आठरा महिन्यांच्या १० १२ कालवडींचे संगोपन केले जाते गोठयामध्ये लहान-मोठे मिळुन २७ ते २८ जनावरांचे संगोपन केले जाते जनावरांचे आरोग्य चांगले रहावे यासाठी वेळोवेळी त्यांना लसीकरण केले जाते.

**• दुध व्यवसायातील उत्पन्न :**

सध्या दुभत्या गाई ८ आहेत त्यांच्यापासुन दररोज दोन वेळेच मिळून १५० ते १७९ लिटर दुध मिळते दुधाला ३ .९ ते ४.० अशी फेंट मिळते. त्यामुळे प्रति लिटर त्यांना २५ रू दर मिळतो दुधाची जागेवर खाजगी दुध केंद्राला विक्री होते यासाठी दररोज प्रती गाईला सहा किलो पशुखादय

दोन किलो भुसा तसेच पशुतज्ञांच्या सल्ल्यानुसार खुराक आणि मेडिकल पावडर दिली जाते.

**• वर्षभरातील अतिरिक्त उत्पादन :**

लहान मोठया मिळून २८ जनावरांपासुन दरवर्षी ४० ट्रॉली शेणखत मिळते संध्या २००० ते २५०० प्रती ट्रॉली शेणखताचा दर आहे. त्यातुन एक लाख रूपयांचे उत्पन्न मिळते दरवर्षी किमान १, १२ नवीन कालवडीची विकी होते त्यातुन काटींचे संगोपण केले जाते. तसेच किमान १८ महिने वयाच्या प्रती कालवडीपासुन २५०० हजार रुपये मिळतात. शेणखतातुन मिळालेले पैसे हे त्यांच्या खादयासाठी वापरले जाते. त्यामुळे वधु आणि कालवडी पासुनचे उत्पन्न फायदयात राहते.

गोठयातुन बाहेर पडलेले मुत्र एका खडयात साठवले जाते. तेथुन पाईपमधुन ते थेट शेताला पिकापर्यंत पोहोचवले जाते जमिनीची प्रत वाढवण्यासाठी गोमुत्राचा वापर चांगला होतो.

२) नाव:- सुधीर दरंदले

नेवासा तालुक्यातील आपल्या सोनई गावातील दुध धंदा अग्रकमीत आहे. अरुण यांच्याकडे २००४ सालापासून त्यांच्याकडे दुग्ध व्यवसाय आहे. कुटुंबाने टप्प्याटप्प्याने सुधारणा करीत दुध व्यवसाय आधुनिक व फायदेशीर केला आहे पाच एकर शेती असणा-या या वामन परिवाराने भाजीपाला उत्पादनातही ओळख निर्माण केली आहे.

**•पध्दतशीर व्यवस्थापन :**

दुध उत् पादन कायम रटकवण् यासाठी सुधीर यांांनी चारा पाणी व आरोग् य व् यवस् थापनावर मुख् य भर फदला आहे गावातील पाच शेतक-यांांच् या आदशष गोठयामध् ये सुध यांचा गोठा व्यवस्थान आकर्षक व सोईस्कर आहे. साधारणपणे २० गाईचे संगोपन गोठयात केले जाते.

जनावरांना सकाळी सात व सायंकाळी सहा वाजता गव्हाणी साफ करून त्यात पाणी सोडण्यात येते. त्यानंतर खादय दिले जाते. त्यांच्या गोठयातील शेणखत तीन-चार महिन्यांनी काढण्यात येते गाईंना वेळोवेळी लसीकरण देखील केले जाते.

**• गोठा व्यवस्थापन :**

८ फुट लांब आणि फुट रूंद आकारात भोवताली कम्पाउंड असलेला मुक्त गोठा आहे. शेड केलेले आहे त्यातील मुक्त जागेत जनावरांना संचार करण्यासाठी मोकळीक दिली आहे. चारही बाजूंनी त्य वृक्ष लागवड केलेली आहे. त्यांनी २००४ पासून चार गाईपासुन व्यवसायाला त्यांच्या वडिलांनी सुरुवात केली आज मुक्त गोठयात एकुण जनावरांची संख्या ३ इतकी आहे. त्यांच्याकडे सगळया गाई जर्सी जातवत आहे.

**• मुक्त गोठ्यामुळे झालेला फायदा.**

१.जनावरांना मुक्त फिरण्याची मोकळीक त्यामुळे व्यायाम झाला बैठक

व्यवस्थित आनि स्वंथ प्रक्रियेत सुधारणा झाली.

२. दोन वेळा चारा व गरजेनुसार पाणी पिणे शक्य झाले.

३. जनावरे फिरत राहिल्याने त्यांची नख्यांची वाढ झाली नाही आणि

गोबिड देखील होत नाही.

४. मुक्त गोठा व्यवस्थापनाने त्यांना मजुरांची गरज पडली नाही आणि

खर्चात बचत झाली.

५. एकुण व्यवस्थापनात दुध उत्पादनात वाढ झाली.

**• १० ते १२ टन मुरघास उपलब्ध :**

सदयस्थितीमध्ये १२ टन मुरघास मका, कडवळ उपलब्ध आहे. सुमारे तो गुरघास तीन महिने पुरेल इतका आहे. ही गुरघास प्रक्रिया सतत चालू असते वा यात गुळ, मीठ, युरीया आणि प्रथिने एकत्र करून चारा मुरघासामध्ये अधिक चवदार होतो असा अरुण याचा अनुभव आहे. मुरघास महिन्यापर्यंत मुरवून पुढे एक वर्षापर्यंत परता दुध उत्पादनात या खात्याचा खूप मोठा वाटा आहे.

**५. प्रतीगाई मागे एक कोंबडी:-**

मुक्त गोठ्यात ३० गाई मागे ३० कोंबड्या सोडण्यात आल्या आहेत. गोचीड त्यातुन साफ होतात. गोठा सफाईसाठी मजुराची गरज कमी होते. शिवाय कोबड्या दिवसाकाठी २० २५ अंडी देतात.

वर्षाला सुमारे १२ ते १८ गाई दुधाळ असतात. प्रती गाय दररोज दोन्ही वेळा मिळुन लिटर दुध देते काही गायी १८ से २० लिटर दुध देतात. त्यांना २३ रु प्रती लिटर बाजारभाव मिळतो गाईपासुन प्रती दिन ३०० रूपये मिळतात. त्यातील चारा किंवा एकात्मीक आहार मजुर, औषधोपचार वाहतुक असा मिळुन १५० रुपये खर्च असतो. पूर्वी हाच खर्च २०० रुपये असायचा मात्र घरीच विविध खादयाची निर्मिती सुरू केल्यापासून त्यावरील

मजुरांवरील खर्चात बचत केली आहे महिन्याला सुमारे पाच ते सहा ट्रॉलीपर्यंत शेणखत मिळते. पिकांचे अवशेष, पाचट, यांचाही वापर शेणखतात. होतो वर्षामधुन १० ते १५ कालवडीची विकी देखील होते.

३ नाव :- प्   रणवण ढोकणे

गावामध्   ये राहत्   या वस्   तीवर ढोकणे यांचे घर व पशुपालन व्   यवसाय आहे. वडिलोपार्जीत त्यांची केवळ दोन एकर शेती आहे. पूर्वी त्यांचे वडील शेतीबरोबर जनावरे पालनाचा व्   याप साांभाळायचे. त्   यानांतर ढोकणे याांनी आपल्   या बारावी नांतरच्   या णशक्   षण आपल्या दुध व्यवसायात मन लावून काम करीत आहेत अगदी साध्या पध्दतीने ते गाईंचा सांभाळ करतात. लवकरच गोठयाच्या रचनेत ते सुधारणा करणार आहेत.

**● दुध व्यवसायातील यश:-**

दुध व्यवसाय चिकाटीने केल्यास त्यातुन सर्वसाधारण नोकरीएवढे उत्पन्न णमळु शकते व शेतीही सुधारता येते हे जाणुन ढोकणे याांनी व्   यवसायात साातत्   य राखले आहे वडिलांकडून जबाबदारी स्विकारल्यानंतर पहिले नियोजन करताना गावातील प्रभात दुध संकलन केंद्राकडून ५० हजारांची उचल घेवून गाईंचे संगोपन वाढवले राहत्या घरालगत ५० फुट लांब व १८ फुट रुंदीच्या साध्या गोठयामध्ये तळावरील भागावर मॅटीने आहेत दीड फुटाच्या गव्हाणीपासुन योग्य अतार देवुन बाजुने नाला आहे. त्यांच्या जमिनीत दहा गुंठयातील घासाची २५ दिवसाला फेरकापणी केली जाते. त्यांच्याकडे सध्या १२ गायी आणि ५ कालवडी

आहेत.

त्यांच्या दुधाला २२ रू प्रती लिटर भाव मिळतो दुधाला दर फुट आणि डिग्री (२९.५/३. ५) या एककात मोजुन भाव मिळतो.

**दैनंदिन नियोजन :**

सकाळी साडेपाच वाजता गोठयातील व्   यवस्   थापन सुरू होते. ढोकणे यांचे आई, वडील, आणि बहिण यांची व्यवस्थापनाला मदत होते. प्रत्येक गाईला घास, मका, उस व कडब्याच्या एकत्रीत कुट्टीची सात किलो प्रती गाईला खायला देतात. त्यानंतर व्यवस्थापन करताना गोठ्यातील शेण काढणी सुरू करतात. त्यानंतर गाईना खुराक दिला जातो त्यांच्याकडे यंत्राऐवजी हातानेच दुध काढणी केली जाते प्रती गाय दरदिवशी किमान १५ लिटर ते २२ लिटर पर्यंत दुध मिळते दुध काढणीनंतर गोठा स्वच्छ पाण्याने धुतला जातो दर पंधरवाडयाला सर्व गाई धुतल्या जातात. गोठा स्वच्छतेनंतर गाईंना पुरेसे पाणी पिण्यास दिले जाते

त्यांनतर पुन्हा चारा दिला जातो आणि दिवसभर विश्राम दिला जातो सायंकाळी पाच वाजता सकाळप्रमाणे पूर्ववत व्यवस्थापन केले जाते. गावामध्येच दुध संकलन केंद्र असल्याने मोटरसायकल वर विकीसाठी दुध नेले जाते जनावरांसाठी लागणारे खादय दर महिन्याला एकत्रीत खरेदी केले जाते. गाईंचा औषधोपचार व देखभालीसाठी गावातील खासगी डॉक्टरची मदत घेतात.

वेळोवेळी गाईंना रोगापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला जातो म्हणजेच वेळोवेळी लसीकरण केले जाते.

**४.३ दुध व्यवसायाचे अर्थशास्त्र :-**

एकुण शेती: २ एकर

शेतीमध्ये 10 गुंठे घास २० गंठे मका, २० गुंठे कडवळ आणि ३० गुंठे ऊस असे पीक चा-यासाठी घेतले जाते त्यामध्ये मका आणि कडवळ आलटुन पालटुन केले जाते.

बारा गाई आणि पाच कालवडी संगोपन केले जाते.प्रति गाय सुमारे १५ ते १८ ली.दुध देते.त्यामध्ये ७ गायी दुभत्या आहेत.दर दहा दिवसांत १००० लिटर दुध विक्री होते.

दुधाची गुणवत्ता चांगली असल्याने प्रती लिटर २२ रू प्रमाणे दरमहा (५५००० रु उत्पन्न मिळते. दरमहा खादय व खादय औषधोपचार यावर सुमारे २०००० रू खर्च होतो.(सर्व जनावरे) साधारपणे खर्च वजा जाता ३५००० रु दरमहा प्रविण यांना मिळतात.

दरवर्षी शेतीला वापरून उर्वरीत शेणखताची विक्री केली जाते प्रती ट्रॉली २५०० रू भाव शेणखताला मिळतो मागील वर्षी ६०००० रु. शेणखताची विक्री केली.

दुध व् यवसायातुन सवष खचष तसेच घरखचष पेलुन भरघोस उत् पन् न प् रणवण ढोक मिळवले आहे.

# प्रकरण पाचवे

## संदर्भ आणि प्रश्नावली

१.१ समस्या :

गाव परिसरामध्ये असणा-या जनावरांच्या दुध व्यावसायामध्ये समस्या निर्माण होतात. आजही दुध व्यवसायात दुधाच्या प्रतीनुसार भाव या संकल्पनेचा वापर होत नाही. दिवसेंदिवस दुधाच्या मेसळीचे प्रमाण वाढत आहे.

शेतक-यांने दुध उत्पादित केल्यानंतर पुढील सर्व पातळयावर दुधामध्ये जास्तीत जास्त भेसळ होउन शेवटी ग्राहकांना निष्कृष्ठ दर्जाचे दुध पोहोचते दुध गुणप्रत नियंत्रण यंत्रणेचे सक्षमीकरण आणि आधुनिकीकरण झाल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही.

दुध व्यवसायामध्ये चारा आणि खादयाच्या नियोजनाचा अभाव हा सर्वात मोठा प्रश्न आहे. शेतकरी आणि शासनाला जास्त पैसा देण्याचा व्यवसायासाठी लागणा-या चारा पिकाखाली केवळ २० % क्षेत्र आहे.

चारा पिकाला अनेक ठिकाणी पाण्याची उपलब्ध करून दिली जात नाही उपलब्धतेनुसार एकाच प्रकारचा चारा जनावरांना खाउ घातला जातो.

त्याचा परिणाम गाईच्या आरोग्यावर तसेच दुध उत्पादनावर होतो उस कारखाना सुरू असताना जनावरांना केवळ उसाचे वाढे खाउ घालुन दुध व्यवसाय केला जातो. परंतु वाढयामध्ये असलेल्या ऑग्झिलेटमुळे जनावराच्या शरीरातील कॉल्शीयम कमी होवून गाईंचे

आयुष्य कमी होते. गाईंना दलदल व्दिदल आणि कोरडा चारा संतुलित प्रमाणात देण्यासाठी योग्य नियोजन होत नाही.

गरजेनुसार पोषणाचा अभाव ही एक मोठी समस्या दूध व्यवसायामध्ये आहे. नैसर्गिक पध्दतीने जनावरांचे पालन केल्यास दुधउत्पादन वाढते. परंतु आपल्या पारंपारिक दुध व्यवसायामध्ये जनावरांना गोठयात बांधून ठेवले जाते.

शिवाय बंदिस्त गोठयात गाई जेथे चारा खातात तेथेच शेण पडते या शेणावर त्या बसतात. त्यामुळे त्याच्या कासदाह या घातक आजाराचे प्रमाण वाढते गाई आजारी पडण्याचे प्रमाण वाढुन त्यांच्या वैदियकिय खर्च वाढतो.

गोचिडांचे प्रमाण वाढून ताप येण्याचे प्रमाण वाढते. दुध व्यवसायात सुयोग्य तंत्रज्ञान निर्माण विस्तार चांगल्या योजना वितरण यासारख्या उणिवा आहेत. तसेच मजुरांची उपलब्धता चा-याचा अभाव, भांडवलाची उपलब्धता, दुधाचा दर याबरोबरच समाजाला या व्यवसायाकडे बघण्याचा दृष्टीकोन या समस्यांना तोंड देत या व्यवसायाला पुढे घेवून जाणे गरजेचे आहे.

**५.२ निष्कर्ष :**

• दुग्ध व्यवसायामुळे केंदळ गावतील शेतक-यांच्या वार्षिक उत्पन्न मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.

• गावाच्या आर्थिक व सामाजिक विकास घडून आला आहे.

• शेतीला जोडधंदा म्हणून शेतकरी या पशूधन व्यवसायाकडे वळत

आहे.

• बेरोजगार तरुणांना हा व्यवसाय चांगला रोजगार आहे. हणून पर्याय उभा आहे.

## ५.३ संदर्भ

ॲग्रोवन मासिक

सकाळ दैनिक

**www-pragatshilshetkari.com**

**www.sakalpapaer.com 19/05/2019**

**५.४ प्रश्नावली :**

नाव

शिक्षण -

वय -

१. पशुधन व्यवसायाला सुरुवात कधी केली ?

२. कोणत्या प्रकारच्या गायी आणि म्हैस आहेत ?

३. या व्यवसायाचे चा-याचे व्यवस्थापन कसे कराता.

४. यापासून मिळणारे मासिक उत्पन्न किती आहे.

५. उत्पादित दूधाची विक्री कशी करता ?

६. दूधाला प्रति लिटर किती भाव मिळतो. ?

७. या व्यवसायातील मुख्य समस्या कोणत्या ?

८. शासकिय योजनांचा लाभ घेता का ?

९. समस्यांवर उपाया योजना कशा करता ?

# धन्यवाद.